# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्यविद्यापीठ)

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

आ.जा./क्र./145 दि. ०४/०४/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालय
तथा सर्व विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना 'निबंध स्पर्धेत' सहभागी करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. तरी निबंध स्पर्धा दिनांक ०५ ते २५ एप्रिल, २०२५ रोजी या कालावधित घेण्यात येत असून सदर स्पर्धेचे बक्षिस वितरण प्रथम पारितोषिक रू. ५,०००/—, द्वितीय पारितोषिक रू. ३,०००/— तृतीय पारितोषिक रू. २,०००/— या स्वरूपात असून सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली सभागृह (जुनी इमारत) येथे करण्यात येणार आहे.

करिता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी करून निबंध स्पर्धा यशस्वितेसाठी सहकार्य करावे, ही विनंती.

**टिप: स्पर्धेचे विषय आणि नियम संलगिनत केले आहेत.**

**डॉ. विनायक शिंदे**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**
**अध्यासन समन्वयक**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि —४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्यविद्यापीठ)

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली


---

निबंध स्पर्धेचे विषय आणि नियमावली

**निबंध स्पर्धेचे विषय:—**

१) राष्ट्रसंतांचे शिक्षण विषयक विचार.

२) राष्ट्रसंतांचे राष्ट्र जागरण विषयक विचार.

३) राष्ट्रसंतांचे अंधश्रध्दा निर्मूलन विषयक विचार.

४) राष्ट्रसंतांचे साहित्य आणि विचार.

५) राष्ट्रसंतांचे ग्रामविकास विषयक विचार.

६) राष्ट्रसंतांचे युवकांना अवाहन.

**निबंध स्पर्धेचे नियम व अटी:—**

१) ही निबंध स्पर्धा पदवी/पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.

२) निबंधाची शब्द मर्यादा कमित—कमी ८०० ते १५०० शब्दांमध्ये असावा.

३) निबंध ए फोर (A4 size झेरॉक्स पेपर) हस्तलिखित स्वच्छ पांढऱ्या कागदावर लिहिलेला असावा.

४) मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तिन्ही भाषांमध्ये निबंध स्वीकारल्या जाईल.

५) लेखी निबंध स्वीकार केले जाईल.

६) निबंध लिहुन झाल्यानंतर सगळयात शेवटी त्याच कागदावर आपले स्वत:चे पूर्ण नाव, वर्ग, महाविद्यालयाचे/विभागाचे आणि विद्यापीठाचे पूर्ण नाव न चुकता लिहणे आवश्यक आहे.

७) सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जातील.

८) परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.

९) निबंध स्विकारण्याची अंतिम तारीख २५ एप्रिल, २०२५ आहे.

१०) दिनांक २५ एप्रिल, २०२५ सांयकाळी ५:३० वाजता पर्यंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र, समन्वयक, डॉ. विनायक शिंदे यांच्या कडे जमा करावे व दिनांक २५ एप्रिल, २०२५ सांयकाळी ५:३० वाजता नंतर आॅलेले निबंध स्वीकारले जाणार नाही.

११) निबंध स्पर्धेचे निकाल जाहीर होत पर्यंत स्पर्धक आपले निबंध इतर कुठेही अगदी फेसबुकवर देखील प्रकाशित करू शकणार नाही.

१२) निबंधावर कोणाचा आक्षेप आल्यास त्याला स्पर्धा संयोजक जबाबदार असणार नाही.

१३) विजेत्यांचा निकाल दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रमात गोंडवाना विद्यापीठ सभागृह (जुनी इमारत) येथे जाहीर करण्यात येईल.

१४) निबंध जमा करण्यापूर्वी सर्वांनी आपली नोंदणी करावी नोंदणी लिंक पुढील प्रमाणे आहे.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScvacBhZVIzaOd2Zj0AFEKE2H9DYnpzIgn8yAvIIX3y_RWgrg/viewform?usp=dialog

१५) निबंध लिहुन स्कॉन करून पी.डी.एफ. drvbshinde@gmail.com या ई—मेल वर पाठवावे आणि हार्ड कॉपी प्रत्यक्ष अथवा स्पीड पोस्टा द्वारे डॉ. विनायक शिंदे, समन्वयक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र, गोंडावाना विद्यापीठ, गडचिरोली एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, पीन क्र. ४४२६०५ या पत्यावर पाठवावे.

१६) संपर्क करिता दुरध्वनी क्रमांक ९४२०४५९७९०.

**डॉ. विनायक शिंदे**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**
**अध्यासन समन्वयक**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**